**L. A. BILL No. IX OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९४९ चा महा. ५९.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ३१४५—१ (१०४५-२-२०२४)

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मधील, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईलः— १९४९ चा महा. ५९.

“परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून, शक्य असेल तेथवर, चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :”. २०२४ चा महा. .

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) याच्या पहिल्या परंतुकामध्ये अशी तरतूद आहे की, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून, शक्य असेल तेथवर, तीन पालिका सदस्य, परंतु दोनपेक्षा कमी नाहीत व चारपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.

**२.** सद्यःस्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि प्रभागांमधील सेवा व विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, अशी तरतूद करणे आवश्यक आहे की, महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून, शक्य असेल तेथवर, चार पालिका सदस्य, परंतु तीन पालिका सदस्यांपेक्षा कमी नसतील आणि पाच पालिका सदस्यांपेक्षा अधिक नसतील एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील. त्या प्रयोजनाकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकाऐवजी, नवीन परंतुक दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>
दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४.

**एकनाथ शिंदे,**<br>
मुख्यमंत्री.

## सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक ९.—महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे)

### (सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९)

**१.** ते **४.** ** ** **

**५.** (१) व (२) ** ** ** महानगरपालिकेची रचना.

(३) पालिका सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्यांची संस्था व सीमा राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील. म्हणजे ज्यायोगे, व्यवहार्य असेल तितपत, सर्व प्रभाग आटोपशीर क्षेत्रे होतील आणि प्रत्येक प्रभागातील व्यक्तींची संख्या अगदी अलिकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार अदमासे तीच राहील. प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल :

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर तीन पालिका सदस्य, परंतु दोनपेक्षा कमी नाहीत व चारपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र महानगरपालिका व नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर, पोट-कलम (३) अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना, अशा अधिसूचनेच्या तारखेनंतर घेण्यात आलेली सार्वत्रिक निवडणूक व त्यानंतरच्या निवडणुका याव्यतिरिक्त अन्य निवडणुकांच्या बाबतीत परिणामकारक असणार नाही.

आणखी असे की, पोट-कलम (३) अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी तिचा मसुदा, शासकीय **राजपत्रात** आणि ज्या रीतीने ही माहिती, अशा मसुद्यामुळे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या निदर्शनास आणता येईल अशा राज्य शासनाच्या, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने मते उत्कृष्ट असलेल्या अन्य रीतीने प्रसिद्ध केली पाहिजे व त्याबरोबरच ज्या तारखेपर्यंत किंवा तारखेपूर्वी कोणतीही आक्षेप व सूचना स्वीकारल्या जातील ती तारीख आणि, ज्या तारखेनंतर मसुदा विचारात घेतला जाईल ती तारीख विनिर्दिष्ट करणारी नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे.

**स्पष्टीकरण.—** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या "अलिकडच्या जनगणनेची आकडेवारी" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(अ) अंतिमतः प्रसिद्ध झालेली अलिकडच्या जनगणनेची आकडेवारी, असा असेल. आणि अलिकडच्या जनगणनेची अंतिम आकडेवारी प्रसिद्ध होईपर्यंत त्याचा अर्थ, अशा जनगणनेची प्रसिद्ध झालेली तात्पुरती आकडेवारी, असा असेल; आणि

(ब) अलिकडच्या जनगणनेची संबंधित अंतिम किंवा तात्पुरती आकडेवारी उपलब्ध नसेल तेव्हा, अलिकडच्या जनगणनेच्या लगतपूर्वी झालेल्या जनगणनेची संबंधित अंतिम आकडेवारी, असा असेल.

(४) आणि (५) ** ** **

**५अ.** व **५ब.** ** ** **

**६.** ते **४९३.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.]**

**[महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई